# आदर्श लक्षाधीश आणि इतर गोष्टी

- अश्विनी धोंगडे



म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : बा.वा.
दा. क. २८३७

BVBK-0402837

# आदर्श लक्षाधीश

## आणि इतर गोष्टी

अश्विनी धोंगडे

BVBK-0402837

दिलीपराज प्रकाशन, प्रा. लि.

# आदर्श लक्षाधीश आणि इतर गोष्टी

# ADARSHA LAKSHADHEESH AANI ITAR GOSHTI

I. S. B. N.-81-7294-006-8

प्रकाशक :

दिलीपराज प्रकाशन प्रा. लि.

राजीव दत्तात्रय बर्वे, डायरेक्टर

२५१ C शनिवार पेठ,

पुणे ४११ ०३०.

© लेखकाधीन

प्रकाशन क्रमांक : ५१२

प्रथम आवृत्ती

डिसेंबर, १९९२

मुखपृष्ठ :

रमेश भारताल

मुद्रक :

एस. आर. अग्रवाल

ज्ञानसरिता मुद्रणालय

८/११ एरंडवणे, पुणे ४११००४

मूल्य

दहा रुपये मात्र

बा० वा०

२८३६
९/८/८३

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
क्र. क्र. २८३६ दिनांक ९/८/८३
विषय बा.वा. क्र..........

# अनुक्रम

आदर्श लक्षाधीश / ५

धनुर्विद्येचे कसब / १२

सण आईचा / २३

एका घराचा मृत्यू / २९

नीलमण्यांची माला / ३५

# आदर्श लक्षाधीश आणि इतर गोष्टी

डॉ. अश्विनी धोंगडे

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. 2636 दिनांक 9/8/83
विषय गो.वा. क्र.

# आदर्श लक्षाधीश

हयुजी अर्स्काईन हा एक छान तरुण मुलगा होता. तो त्याच्या सहवासातल्या सगळ्यांनाच खूप आवडे. तो कधी कोणाला शब्दानंही दुखवत नसे. तसा फारसा हुशार नव्हता आणि पैसेवालाही नव्हता. नोकरीतही एके ठिकाणी त्याचा पाय ठरत नसे. कधी ही नोकरी, तर कधी ती. कधी चहाचा व्यापार, तर कधी कपड्यांचा. पुन्हा त्याचा कंटाळा आला की आणखी कुठे तरी. शेवटी कंटाळून त्यानं नोकरीच सोडून दिली आणि म्हाताऱ्या मावशीकडून वर्षाला मिळणाऱ्या दोनशे पौंडावर तो कसंबसं भागवू लागला.

त्यातच लॉरा नावाच्या एका श्रीमंत मुलीवर त्याचं प्रेम बसलं. पण लॉराचे वडील गर्भश्रीमंत. तर हा एक गरीब मुलगा. दोघांचं लग्न व्हायचं कसं ?

' हे बघ, तू एक दहा पौंड तरी कमवून दाखव. मग बघू

लग्नाचं !' असं तिच्या वडिलांनी त्याला सांगून टाकलं. बिचारा ह्युजी ! गप्प बसला झालं !

एके दिवशी सकाळी ह्युजी सहज म्हणून आपल्या एका चित्रकार मित्राकडे गेला. त्याचं नाव ॲलन ट्रेव्हर. ॲलनची दाढी तांबडी होती आणि तो दिसायचासुद्धा जरा विचित्रच. पण तो एक चांगल्यापैकी चित्रकार होता आणि पुष्कळ लोक त्याची चित्रं विकत घ्यायचे.

ह्युजी आत आला तेव्हा एका भिकाऱ्याचं चित्र पूर्ण करण्यात ट्रेव्हर रमला होता. खोलीच्या एका कोपऱ्यात एका पाटावर एक भिकारी उभा होता. थकलेला, वाकलेला आणि कोणाच्याही मनात त्याच्याबद्दल कणव निर्माण व्हावी असा त्याचा सुरकुतलेला चेहरा. सगळीकडून फाटलेला, चिंध्या लोंबणारा असा एक मळकट कोट त्यानं अंगावर चढवला होता. त्याच्या पायात फाटके-तुटके जाड बूट होते. एका हातातल्या काठीवर तो भार देऊन उभा होता आणि दुसरा हात त्यानं पैशासाठी पुढे पसरला होता.

'वाऽ काय छान मॉडेल आहे !' त्याच्याकडे पाहात ह्युजी म्हणाला.

'छान मॉडेल ? अगदी खरं बोललास.' ट्रेव्हर म्हणाला, 'अरे, ह्याच्यासारखा भिकारी रोज मिळणं कठीण.'

'बिच्चारा म्हातारा !' ह्युजी म्हणाला. 'किती दिनवाणा दिसतोय रे तो !'

'अरे दिसलाच पाहिजे. नाहीतर भिकाऱ्यानं आनंदी दिसायला पाहिजे होय रे ?'

' काय रे, ह्याला तू असं तुझ्यासमोर बसण्यासाठी एक वेळचे किती पैसे देतोस ?' ह्युजीनं चौकशी केली.

' देतो तासाभराचे १० पेन्स. '

' आणि काय रे, तुला तुझ्या चित्राचे किती पैसे मिळतात ?

' मला ना, मिळतात की दोन-तीन हजार पौंड.'

' बाप रे, मग तर तू खरं म्हणजे तुझ्या मॉडेललाही तुझ्या पैशातला काही हिस्सा द्यायला हवास.' ह्युजी म्हणाला, ' तुझ्याइतके कष्ट त्यालाही पडतात की.'

' मूर्ख आहेस बेट्या, इथं दिवसभर उभं राहून चित्र रंगविण्यातलं माझं कसब बघ. हे काय सोपं काम आहे, असं वाटलं की, काय तुला ? आता बडबड बंद कर आणि मला त्रास देऊ नकोस. हवं तर एक सिगरेट ओढ आणि मुकाट बसून रहा.'

थोड्या वेळानं ट्रेव्हरला भेटण्यासाठी एक माणूस आलाय म्हणून नोकरानं निरोप दिला.

' मी येतोच रे दोन मिनिटात. लगेच पळू नकोस.' ट्रेव्हरनं ह्युजीला बजावलं. ह्युजीसमोर एका फळकुटावर तो भिकारी बसला होता. त्याचा तो एकाकी दीनवाणा चेहरा पाहून ह्युजीला वाईट वाटलं. त्यानं आपले खिसे चाचपडले आणि त्याला एक सोन्याचं नाणं सापडलं.

' बिच्चारा म्हातारा ' त्याला वाटलं. माझ्यापेक्षा त्यालाच

ह्या पैशाची गरज आहे.' ह्या विचारानं ह्युजी उठला आणि त्यानं ते नाणं त्या भिकाऱ्याच्या हातावर ठेवलं.

म्हातारा खूष झाला आणि खुषीची एक हसरी रेषा त्याच्या ओठावर उमटली.

'देव तुमचं भलं करेल साहेब' म्हाताऱ्या भिकाऱ्यानं त्याला दुवा दिला. तेवढ्यात ट्रेव्हर आला आणि त्याचा निरोप निरोप घेऊन ह्युजी निघाला.

रात्री ११ वाजता पॅलेट क्लबवर ट्रेव्हर एका टेबलाशी एकटाच काही तरी थंड पेय पीत बसला असलेला ह्युजीला दिसला.

'काय, तुझं चित्र पूर्ण झालं नाही ?' सिगरेट पेटवत त्यानं ट्रेव्हरला विचारलं.

'नुसतं तयार झालं नाही, त्याची फ्रेमसुद्धा तयार झाली.' ट्रेव्हर म्हणाला, 'आणि बरं का रे, तो म्हातारा तुझ्यावर अगदी खूष होता. तू कोण आहेस, कुठं राहतोस, काय करतोस, सगळं सगळं मला विचारत होता...'

'बाप रे, म्हणजे एव्हाना तो माझ्या घरी नक्की माझी वाट पाहात बसला असेल. बरं जाऊ दे, गंमत पुरे ! मला त्याची खरंच फार दया आली आणि त्याच्यासाठी काही तरी करावं असंही वाटायला लागलं. दारिद्र्य किती महाभयंकर असतं, नाही ! घरात माझ्याकडे पुष्कळ जुने कपडे पडलेत. ते त्याला मी दिले तर आवडेल ना त्याला ? त्याच्या अंगावरचे कपडे म्हणजे नुसत्या चिंध्या होत्या ना रे फाटक्या तुटक्या.'

'अरे, पण त्या चिंध्यातच तो झकास भिकारी दिसतो.' ट्रेव्हर म्हणाला. 'त्यानं उद्या छान कपडे घातले तर कोण काढेल त्याचं चित्र? पण तरीसुद्धा तू देऊ केलेल्या कपड्यांबद्दल विचारीन मी त्याला. पण काय रे, लॉरा काय म्हणते? तुला खरं सांगू, तो म्हातारासुद्धा खोदून खोदून तिची चौकशी करीत होता, बरं का!'

'तू त्या भिकाऱ्याशी तिच्याबद्दलही बोललास वाटतं?' ह्युजी जवळजवळ ओरडलाच.

'हो तर, त्यात काय बिघडलं? अरे, तुझी सुंदर लॉरा, तिचा खडूस बाप आणि त्याची दहा हजार पौंडाची अट सगळं त्याला ठाऊक आहे.'

आता मात्र ह्युजी संतापानं चांगलाच लालीलाल झाला. 'माझ्या या खाजगी गोष्टी तू चक्क एका भिकाऱ्याला सांगितल्यास?'

ट्रेव्हर हसत हसत म्हणाला, 'तू ज्याला मघापासून म्हातारा भिकारी म्हणतोयस ना, तो युरोपमधला एक सर्वात श्रीमंत माणूस आहे. त्यानं मनात आणलं तर तो उद्या हे सर्व लंडन शहर विकत घेईल आणि तरीही त्याचे फारसे पैसे खर्च झालेले नसतील. तुला ठाऊक आहे, जगातल्या सर्व प्रमुख शहरांत त्याच्या इमारती आहेत. तो सोन्याच्या ताटात जेवतो आणि त्यानं मनात आणलं तर रशियालासुद्धा तो युद्धापासून थोपवू शकतो.'

'हे सगळं तू काय बोलतोयस?' ह्युजी गोंधळून म्हणाला.

'मी बोलतो त्यातला शब्द न् शब्द खरा आहे.' ट्रेव्हर

म्हणाला. 'तुला आज भेटलेला तो म्हातारा म्हणजे बॅरन हाऊसबर्ग. तो माझा जानी दोस्त आहे. तो माझी चित्रं विकत घेतो. त्यानंच महिन्यापूर्वी त्याचं भिकाऱ्यासारखं चित्र रंगवायला सांगितलं आणि त्यासाठी तो भरपूर पैसे देणार होता. मग मी तरी नाही कशाला म्हणू ? आणि मला वाटतं, त्यानं खरंच मॉडेल म्हणून अगदी उत्तम काम केलं.'

'बॅरन हाऊसबर्ग ! काय सांगतोयस काय ? बापरे ! आणि मी चक्क त्याच्या अंगावर एक नाणं फेकलं.'

'त्याला नाणं दिलंस !' ट्रेव्हर हे ऐकून गडगडाटी हसू लागला.

'ॲलन, तू हे मला आधी सांगितलं असतंस तर माझी अशी फजिती झाली नसती.'

'अरे, मला काय ठाऊक की दया येऊन तू लगेच त्याला भीक घालत सुटशील म्हणून ? आणि शिवाय हाऊसबर्गला त्याचं नाव दुसऱ्याला सांगणं आवडेल की नाही ही भीती देखील माझ्या मनात होतीच.'

'तो किती हसला असेल रे मला मनातून !' ह्युजी ओशाळत म्हणाला.

'अजिबात नाही. अरे, तू गेल्यावर उलट त्याला फार आनंद झाला. आपले म्हाताऱ्याच्या सोंगातले सुरकतलेले तळवे एकमेकांवर घासत तो हसतच सुटला. मला आधी कळेचना की तो तुझ्याबद्दल इतकी माहिती का विचारतोय ! हां ऽ ऽ आता लक्षात आलं, अरे, तू दिलेलं नाणंदेखील तो कुठंतरी भांडवलात घालील आणि दर सहा महिन्यांनी त्याचं व्याज तुला चुकतं करील.

आणि बरं का ? अरे, तुझी ही गंमतसुद्धा मित्रांबरोबर जेवताना त्याला कित्येक दिवस तोंडी लावायला पुरेल.

ट्रेव्हर असं बोलून मोठमोठ्यानं हसत सुटला आणि बिचारा ह्युजी मात्र चिमणीएवढे तोंड करून घरी परतला

दुसऱ्या दिवशी सकाळीच नाश्ता करताना त्याच्याकडे त्याच्या नोकरानं एक चिठ्ठी दिली. त्यावर लिहिलं होतं–

'मी गुस्ताव्ह नॉदिन, बॅरन हाऊसबर्गकडनं निरोप घेऊन आलोय.'

त्यानं त्याला लगेच बोलावलं. सोनेरी काडीचा चष्मा लावलेले आणि पांढऱ्या शुभ्र केसांचे एक गृहस्थ आत आले आणि म्हणाले, 'मला ह्युजी अस्कीईन यांच्याशी जरा बोलायचं होतं.'

'होय, मीच तो. पण प्रथम मला माफी मागायचीय.' ह्युजी सांगू लागला.

ते गृहस्थ स्मित करीत म्हणाले, 'बॅरनसाहेबांनी हे पत्र आपल्यासाठी माझ्याकडे दिलंय.' त्यांनी ते पत्र ह्युजीला दिलं.

पत्रावर लिहिलं होतं,

'ह्युजी अस्कीईन आणि लॉरा मर्टन यांच्या शुभविवाहानिमित्त एक छोटी भेट.

–एका म्हाताऱ्या भिकाऱ्याकडून.'

आत दहा हजार पौंडांचा एक चेक होता.

'लग्न समारंभाला अर्थातच ॲलन ट्रेव्हर आणि बॅरन हाऊसबर्ग दोघेही उपस्थित होते. ॲलन म्हणाला, 'एखादा लक्षाधीश आदर्श मॉडेल म्हणून मिळणं अवघड तर खरंच; पण त्याहीपेक्षा आदर्श लक्षाधीश मिळणं अधिक दुर्मिळ आहे.'

म. वा. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
क्र. २८.३६ दिनांक ९/८/९३
विषय ६११.०१

# धनुर्विद्येचे कसब

**स्वित्झर्लंडचा विल्यम टेल हा एक राष्ट्रीय नेता होऊन गेला. ऑस्ट्रियाच्या जुलमाविरुद्ध तो स्वित्झर्लंडच्या स्वातंत्र्यासाठी उभा ठाकला.**

'बाबा, बाबा, ती गंमत बघितलीत ? एका मोठ्या खांबावर एक लाल टोपी अडकलीय आणि टोपीवर एक उंच पीस अडकवलंय, वा ऽ, टोपी अडकवायला काय छान जागा शोधलीय पण! आणि ते पाहिलंत, हातात भाले घेऊन टोपीच्या दोन बाजूला दोन शिपाई उभे ठाकलेत. मला वाटतं बाबा, खांबावर चढून कोणी ती छान टोपी आणि पीस पळवत नाही ना, हे पाहायला ते तिथं उभे असावेत.'

'चल चल, पोरा पुढे' दबकत्या आवाजात टेलने मुलाला म्हटले. 'आपल्याला काय करायचंय त्या टोपीशी ? तिकडे

पाहूसुद्धा नकोस. तुझा हात माझ्या हातात दे आणि झटपट पावलं उचल. एव्हाना आपण आजोबांकडं पोहोचायला हवं होतं. आपण तिकडच्या बाजूला जरी पाहिलं ना, तरी ती माणसं इथं येऊन आपल्याला थांबवतील.' टेल असं बोलतोय न् बोलतोय तोच हिरवळीवरून पळत एक शिपाई भाल्यानं त्यांचा रस्ता अडवत त्यांच्यासमोर येऊन उभा ठाकला.

'महाराजांचा हुकूम आहे, थांबा.' फ्रिशहार्ट नावाचा तो शिपाई ओरडला. आणि ते नाव त्याला अगदी शोभून होतं. कारण नावाचा अर्थ होता कठोर हृदयाचा.

टेलनं भाला पकडला आणि त्या माणसाला बाजूला ढकललं. वडिलांचा हात सुटल्यानं तो छोटा मुलगा बावरला होता आणि त्याच्या चेहऱ्यावरचं हास्य मावळून तो रडवेला झाला होता.

'मला थांबवण्यासारखं मी काय केलंय ? हा रस्ता सगळ्यांसाठी खुला आहे आणि मी शांतपणे या रस्त्यावरून चाललो होतो.'

'मी काय केलं म्हणून वर विचारतोस होय ? अरे, ढोंगी, लबाड माणसा, या रस्त्यावरून जाणारा-येणारांसाठी आपल्या सरकारनं काय हुकूमनामा काढला आहे तो मला आणि तुलाही चांगला ठाऊक आहे. त्याच हुकुमाची तामिली होतीय ना, ते बघायला बसलोय मी इथं. गुडघे टेकून त्या टोपीला सलाम कर, नाही तर तुरुंगात जायला तयार हो.'

'मी टोपीपुढे कधीच वाकलो नाही आणि आताही वाकणार नाही.' ताठपणे टेल म्हणाला. 'एक स्वतंत्र स्विझर म्हणून

माझ्या नावाला काळीमा लागेल असं कुठलंच काम मी करणार नाही.'

'मग मी तुला अटक करीत आहे.' त्याचा खांदा पकडत आणि भाल्याच्या टोकानं त्याला धमकावणी देत फ्रिशहार्ट म्हणाला, 'बडबड पुरे कर, आपल्या अडमुठेपणाची शिक्षा भोग, नाहीतर तुरुंगात जायला तयार हो.'

आपल्या वडिलांशी चाललेली त्याची ही धसमुसळी वागणूक पाहून वॉल्टर चांगलाच घाबरला. वडिलांना आता धरून नेणार हे पाहताच त्याने मोठमोठ्याने ओरडायला सुरुवात केली. 'धावा धावा, हे दृष्ट लोक माझ्या बाबांना तुरुंगात घेऊन चाललेत.'

पाहतापाहता तिथे बघ्या लोकांची पुष्कळच गर्दी जमली. गर्दी वाढत गेली आणि ही बातमी हां हां म्हणता लोकांमध्ये पसरली. 'धनुर्विद्येत प्रवीण अशा टेलला ते तुरुंगात टाकतायत. किती शांतताप्रिय आहे तो आणि जाणूनबुजून कधीच कोणाला काही त्रास न देणारा.' ॲल्टॉर्फच्या त्या रस्त्यावरून लोकांच्या आरड्या-ओरड्यातले हे शब्द गर्दीतून निनादू लागले.

'ऑस्ट्रियनांपासून त्याची सुटका करा.' रस्त्यावरची गर्दी आणखी वाढली. बायका-पोरं सगळी जमली. लोक आरडाओरडा करू लागले– 'त्याची सुटका झालीच पाहिजे.' लोकांच्या दबावामुळे फ्रिशहार्टलाही त्याला गर्दीतून बाहेर काढून घेऊन जाणे अशक्य झाले.

याच वेळी मोठा हॉर्न वाजला आणि स्वत: हर्मन गेसलर

घोड्यावरून त्या ठिकाणी दाखल झाले. त्यांच्या हातावर एक बहिरी ससाणा बसला होता.

'बाजू हटो, सरकार को जाने दो' च्या गजरात गेसलर-साहेब गर्दीतून आत घुसले. थोड्याशा आदरानं, थोड्याशा भीतीनं लोक डाव्या-उजव्या बाजूला मागे सरकले आणि त्यांनी घोड्याला आत जाण्यासाठी वाट करून दिली.

'काय गडबड आहे?' त्यांनी विचारलं, 'कोणी मोडला हुकूम?'

आपण टेलला अटक का केली ते फ्रिशहार्टने त्याला निवेदन केलं.

'काय टेल,' गेसलर कडकपणे म्हणाले, 'तू तर फार गंभीर असा गुन्हा केलेला आहेस. प्रत्यक्ष राजाशी द्रोह आणि माझ्या आज्ञेचा भंग. ही टोपी इथं ठेवण्यातला हेतू गावातील प्रत्येक माणसाला माहिती आहे. राजनिष्ठ आणि राजद्रोही माण-सांची पारख त्यामुळे आम्हाला होते आणि आजच्या तुझ्या या उद्दाम वागणुकीनं तू राजद्रोही आहेस हेच दाखवून दिलं आहेस.'

विल्यम टेल शांतपणे सगळं ऐकून घेत होता. गेसलर पुढे म्हणाले, 'मी फार दयाळू माणूस आहे आणि तुझी कीर्ती ऐकून आहे. धनुर्विद्येत तू प्रवीण आहेस हे ऐकून आहे. काय, खरं आहे ना?'

आपल्या बाबांची ही स्तुती ऐकून छोट्या वॉल्टरचा चेहरा आनंदित झाला.

'होय महाराज, हे अगदी खरं आहे. माझे बाबा धनुर्विद्येत

अत्यंत कुशल आहेत. अगदी शंभर यार्ड दूर असलेलं झाडावरचं सफरचंदसुद्धा ते आपल्या बाणानं उडवू शकतात.' वॉल्टरने आनंदानं सगळं सांगून टाकलं.

'वा, फारच छान' गेसलर म्हणाले. त्यांच्या त्या खोटचा हसण्याला तुच्छता आणि छद्मीपणाचा चांगलाच वास येत होता.

'वा, वा, ही तर अभिमानाची गोष्ट आहे. हा तुझा मुलगा वाटतं ?'

'होय महाराज.' गेसलरने मुलाकडे लक्ष द्यावं याचं थोडं आश्चर्य वाटत टेल म्हणाला.

'किती मुलं आहेत तुला ?'– पुढचा प्रश्न.

'दोन. दुसरा घरी आहे. याच्यापेक्षा थोडा मोठा.'

'तू जितका कुशल धनुर्धारी आहेस, तितकाच आदर्श बापही आहेस, याची खात्री आहे मला.' हे बोलताना गेसलर अधिक कडवट हसले. 'आता सांग बरं, या दोन पोरातला कुठला मुलगा तुला जास्त आवडतो ?'

'महाराज, माझी दोन्ही मुलं मला सारखीच प्रिय आहेत. पण...' एक क्षणभर थांबत वॉल्टरच्या डोक्यावर हात फिरवत टेल म्हणाला, 'हा थोडा लहान आहे आणि आमच्या देखभालीची याला जास्त जरूर आहे, म्हणून मी याच्यावर कदाचित थोडं जास्त प्रेम करतो.'

'छान, चांगलं सांगितलंस. चागल्या बापाला शोभेसं. पण मी असंही ऐकलंय की, एक धनुर्विद्या सोडली तर इतर सगळ्या गोष्टीत तू अगदी मूर्ख आहेस... हा ऽऽ हा, आज मी अगदी खूष

आहे. टेल, तू आज आमच्यासाठी एक खेळ करायचास आणि या गर्दीचं मनोरंजन करायचंस.'

'लोकहो बघा, मी माझा राग दूर ठेवून कसा दयाळू माणसासारखा वागतोय. टेलची धनुर्विद्येतली कीर्ती टिकवून ठेवणारा एक खेळ आता खेळूया. त्याच्या मुलाच्या डोक्यावर एक सफरचंद ठेवलं जाईल. त्याच्या मुलाच्या सुरक्षिततेसाठी त्याला एका झाडाला बांधलं जाईल आणि शंभर यार्ड लांब उभं राहून– मला वाटतं ह्या हुशार पोरानंच हा आकडा सांगितलाय– अहो मिस्टर धनुर्धारी, तुम्ही त्या सफरचंदावर नेम धरायचाय. पहिल्याचं नेमामध्ये बाण सफरचंदात घुसला नाही तर ज्या गुन्ह्यासाठी तुला अपराधी म्हणून पकडलं होतं त्याच गुन्ह्यासाठी तुझं डोकं उडवलं जाईल. आणि हो, तुझ्याबरोबर तुझ्या मुलाचंही !'

भीतीचा काटा गर्दीवरून सरसरला. त्याच छद्मीपणानं गेसलर लोकांकडे अजूनही बघत होते. लोकांनी भयचकित आश्चर्यानं एकमेकांकडे पाहिलं. ऑस्ट्रियाच्या राजदरबारातील लोकांनाही गेसलरमहाराजांच्या दृष्ट प्रवृत्तीचा राग आल्याविना राहिला नाही. त्यांनी देखील परस्परांकडे आश्चर्यानं पाहिले. ह्या सगळ्या गडबड-गोंधळात इतका वेळ अतिशय शांत मनाने उभा असलेला टेल आता भीतीने थरथर कापू लागला. अर्थातच त्याला स्वत:ची भीती नव्हती; पण छोट्या वॉल्टरच्या प्राणाची मात्र नक्कीच होती.

'महाराज' हात उंचावून त्यांची करुणा भाकत तो म्हणाला, 'महाराज, मला कोणतीही शिक्षा द्या; पण माझ्या छोट्या...'

'मी योग्य तेच सांगितलं आहे आणि अतिशय गंभीरपणे सांगितलं आहे. दुसऱ्या कोणत्याही नव्हे, तर केवळ याच मार्गाने धनुर्विद्येतील आपले कौशल्य तू मला दाखवावेस, अशी माझी इच्छा आहे आणि ते पाहण्यातला आनंद मला उपभोगायचा आहे. अर्थात तुझा याला नकार असेल तर तुझ्यासाठी आणि तुझ्या मुलासाठीही कोणती शिक्षा सांगितली आहे, ती तुला ठाऊक आहेच.'

'महाराज, दया करा' दुखाने हृदय पिळवटून गेलेला टेल हात जोडून म्हणाला, 'माझं काय वाट्टेल ते करा; पण माझा मुलगा निष्पाप आहे. त्याला शिक्षा करू नका. तुम्ही त्याला मारता आहात आणि त्याला मारण्याची शिक्षा मला देताहात! देव आपल्या अंत:करणात थोडीतरी दयाबुद्धी निर्माण करो. मुलाबद्दल बापाला काय वाटतं ते आपल्याला समजण्याची शक्ती देवो. महाराज, आपल्याला मुलगा नाही; पण परमेश्वरला आणि आपल्या अंतकरणातील दयाबुद्धीला आवाहन करून मी आपल्याला पुन्हा पुन्हा विनंती करतो की, आपण माझा काय वाट्टेल तो छळ करा; पण मला एवढं करायला सांगू नका.'

एव्हाना गर्दीतल्या कित्येक बायका रडू लागल्या होत्या. कित्येकजणी गुडघ्यावर पडून ह्या संकटात पडलेल्या वडिलांवर कृपा करण्याचीं देवाला प्रार्थना करीत होत्या. पुरुष माणसंसुद्धा हेलावून गेली होती. अर्थातच हेलावला नव्हता तो एकच माणूस – आणि तो म्हणजे हर्मन गेसलर!

आपल्या पूर्वीच्याच कठोर आणि दयाशून्य स्वरात टेलची हेटाळणी करत तो म्हणाला, 'टेल, खरं म्हणजे हे तुझ्या आव-

डीचं काम आहे. आजपर्यंत इतकं धोकादायक साहस तू कधी पत्करलं होतंस ? हे एक नवीन आव्हान तुला उपलब्ध करून दिल्यामुळे खरं तर तू माझे आभार मानले पाहिजेत. आता मला जास्त बोलण्याचा कंटाळा आलाय चल, तुझा धनुष्य तयार ठेव. आपल्या बरोबरच तू आज धनुष्यबाण घेऊन आलायस ही किती भाग्याची गोष्ट आहे. हे बघ, माझ्या हातात सफरचंद तयार आहे. बोलताबोलता गेसलरमहाराज त्यांनी घोडा ठेवला होता त्या सफरचंदाच्या झाडापर्यंत आलेदेखील !

छोटया वॉल्टरचा आवाज आला. तो अजिबात घाबरलेला नव्हता. 'महाराज, मी कोठे उभा राहू ? बाबा बाण मारणार म्हणजे मला अजिबात भीती नाही. बाबांच्या धनुष्यबाणाने केलेली यापेक्षा कितीतरी अवघड अशी करामत मी पाहिलीय.'

या पोराला लिंबाच्या झाडाला बांधण्याची आज्ञा दिली. वॉल्टर तर म्हणत होता, 'मला अजिबात बांधू नका, मी अगदी स्तब्ध उभा राहतो. गेसलर महाराजांच्या गाडीवानाला त्याची दया येऊन त्यांनी सुचवलं, निदान मुलाचे डोळे तरी बांधा; पण त्यालाही वॉल्टर तयार झाला नाही.

मोजून दिलेल्या जागी टेल उभा राहिला. त्याचे हात कापत होते आणि स्थिर उभं राहणंही त्याला जमत नव्हतं. कोणत्याहीक्षणी तो जमिनीवर कोसळून पडेल, असं वाटत होतं. त्यानं आकाशाकडे पाहिलं आणि परमेश्वराकडून त्याला मदत, आत्मविश्वास, बळ आणि एकाग्रता मिळाली. त्यानं धनुष्याला बाण लावला आणि आपल्या शत्रूकडे एक शेवटचा दृष्टिक्षेप टाकला.

क्षणार्धात त्याच्या मनात एक विचार चमकून गेला. त्यानं अत्यंत बारकाईनं परीक्षण करून भात्यातून एक बाण काढला. त्याचा टोकदारपणा चाचपून पाहिला आणि पट्ट्यात तो बाण ठेवून दिला. डोक्यावर सफरचंद ठेवून निर्भयपणे वॉल्टर झाडाखाली उभा होता.

'बाबा, सोडा आता बाण.' तो ओरडत होता. टेलने बाणाचा नेम लक्ष्यावर धरला. पोराच्या डोक्यात किंवा छातीत बाण घुसणार या भीतीनं बाणाचा प्रवास पाहण्यासाठी गर्दी पुढे सरकली. श्वास खिळवून ठेवणाऱ्या शांततेत धनुष्याचा टणत्कार झाला आणि बाण सुटला. बाणाचे लक्ष्य गाठले गेले. परमेश्वराची केलेली ती निःशब्द प्रार्थना फुकट गेली नाही.

भयंकर उत्कंठेनंतर प्रत्येकानं सुटकेचा निःश्वास सोडला. फक्त दोन माणसं सोडून– एक गेसलर आणि दुसरा टेल. आपलं काम यशस्वी झालंय यावर अजून टेलचा विश्वास बसत नव्हता. त्यानं आपलं धनुष्य खाली टाकलं. बाणाच्या दिशेनं गूढपणे पाहात तो अजूनही पुढं वाकलेल्या स्थितीतच उभा होता

मग कोणीतरी ओरडलं, 'सफरचंद पडलं.' दुसरं कोणी म्हणालं, 'पोराला काहीसुद्धा झालं नाही.' आणि त्यानंतर आनंदातिशयाने सगळेच ओरडू लागले. 'टेलचा नेम बरोबर होता.' ऑस्ट्रियन शिपायांनादेखील 'शाब्बास' म्हणाल्याशिवाय राहवेना. आश्चर्य आणि कौतुकाने ते त्याच्या कौशल्याची तारीफ करू लागले.

मधोमध बाण बसलेलं ते सफरचंद घेऊन वॉल्टर बाबांकडे

धावला. 'बाबा, मी जरासुद्धा हललो नाही. डोळ्यांच्या पापण्यांची उघडझापही केली नाही. कारण किनई मला अजिबात भीती वाटली नाही. तुम्ही मला बाण लागू देणार नाही, याची मला खात्री होती.' तो म्हणाला.

अत्यानंदानं बापानं प्रेमानं कुरवाळलं. या भयंकर परीक्षेत तो पास झाला; पण त्या परीक्षेच्या ताणानं टेल जमिनीवर कोसळला.

काही वेळानं तो उठला आणि छोट्या वॉल्टरचा हात धरून घराकडे निघाला. त्यावेळी गेसलरनं हाक मारून त्याला थांबवलं.

'हे धनुर्श्रेष्ठा, मला तुझ्याशी थोडं बोलायचंय. असा घाईघाईनं जाऊ नकोस.' महाराज म्हणाले, 'तू धनुष्य हातात घेऊन उभा राहिलास, त्यावेळी मी तुझ्याकडे नीट पाहात होतो आणि माझ्या असं लक्षात आलं की, आपल्या हातातल्या बाणाव्यतिरिक्त आणखी एक बाण तू नीट पारखून ठेवला आहेस. अतिशय काळजीपूर्वक तू त्याचा टोकदारपणा तपासलास ! खरं की नाही ? मग आता सांग, हे सर्व तू कशासाठी केलंस ?'

'पहिल्या बाणाचा नेम चुकला तर दुसरा लगेच हाताशी असावा म्हणून ही आमची एक सवय आहे.' उगाच आता आणि काही कटकट निर्माण व्हायला नको म्हणून चांगलं उत्तर देण्याच्या इराद्यानं टेल म्हणाला.

'टेल, मला खरं तेच उत्तर हवंय. तू माझ्यापासून काहीतरी लपवतोस हे उघड आहे. एक सवय म्हणून तू बाण निवडून

ठेवला नाहीस. मला सत्य गोष्ट हवी आहे. मी तुला अभय देतो.'

'ठीक आहे. ऐका तर मग सत्य.' हे बोलताना संताप आणि तिरस्कारानं टेलचे डोळे चकाकत होते. 'जर पहिल्या बाणाचा नेम चुकला असता आणि माझ्या मुलाला बाण लागला असता तर... तर दुसरा बाण तुझ्यासाठी होता, आणि त्या बाणाचं लोखंडी टोक तुझ्या हृदयात घुसून तू एव्हाना कायमचा शांत झाला असतास!'

□

# सण आईचा

हल्लीच्या सणाच्या नव्या नव्या कल्पनांमध्ये ' आईचा सण ' ही सगळ्यात फार छान कल्पना आहे. ११ मे चा दिवस हा खास आईचा दिवस म्हणून अमेरिकेत लोकप्रिय होतोय आणि तो हळू-हळू इतरत्रही लोकप्रिय होऊ लागेल.

आमच्या घरीही आईचा सण साजरा करण्याची कल्पना सगळ्यांना एकदम पसंत पडली. आई आपल्यासाठी त्याग करते, किती कष्ट उपसते याची जाणीव निदान एक दिवस तरी ठेवावी म्हणून हा दिवस आम्ही अगदी धूमधडाक्यात साजरा करायचं ठरवलं. आम्ही सगळ्यांनी त्या दिवशी सुट्टी घ्यायची ठरली आणि आईला आनंद होईल असं वागायचं ठरलं. हा सण साजरा करण्यासाठी आपली मदत व्हावी म्हणून बाबांनी ऑफिसमधून रजा काढली. मी आणि ॲनीनं कॉलेजला दांडी मारली आणि

माझी धाकटी बहीण मेरी आणि धाकटा भाऊ बिल यांनी पण त्या दिवशी शाळा बुडवली.

आम्ही ठरवलं की नाताळच्या सणासारखा सगळा थाटमाट करायचा. फुलांच्या माळांनी घर सजवायचं, भिंतीवर सुभाषितं लिहिलेले कागद डकवायचे आणि अशीच खूप गंमत गंमत करायची. मग आईनं आम्हाला सुभाषितं लिहून दिली. घराचं डेकोरेशन करायला मदत केली. नाताळच्या वेळी हे सगळं काम तीच करते त्यामुळे तिला त्याची सवय होतीच.

माझ्या दोन्ही बहिणी म्हणाल्या की, 'हा सुद्धा एक मोठा सणच आहे तेव्हा आपण सगळ्यांनी नवे कपडे घालू.' पण त्यांना कपड्यावर चांगल्या हॅटस् नव्हत्या म्हणून दोघींनी स्वत:साठी नव्या हॅटस् खरेदी केल्या. आईनं हॅटला छान रिबिनी बांधून दिल्या आणि मग हॅटस् खरंच छान दिसायला लागल्या. या दिवसाची आठवण राहावी म्हणून बाबांनी त्यांच्यासाठी आणि आम्हा दोघा भावंडांसाठी तीन झकास टाय आणले. आम्ही खरं तर आईलाही एक नवीन हॅट आणणार होतो; पण तिचा डोक्याला बांधायचा जुना रुमाल तिला खूप आवडायचा आणि माझ्या बहिणीपण म्हणायच्या की त्या रुमालातच ती खूप छान दिसते.

मोटार भाड्यानं घेऊन शहराबाहेर आईला न्यायचं ठरवून आम्ही तिला एक आश्चर्याचा धक्का दिला. आमच्याकडं एकच मोलकरीण आहे. त्यामुळे आई जवळजवळ दिवसभर घरकामात बुडालेली असते. त्यामुळे तिला बिचारीला बाहेर असं कधीच जायला मिळत नाही आणि आता सहलीला जायला दिवसही

किती छान असतात. बाहेर निसर्ग हिरवागार झालेला असतो. अशा वेळी मैल न् मैल दूर भटकण्यात काही और मजा असते.

पण आयत्या वेळी सकाळी आमचा बेत आम्ही थोडासा बदलला. नुसतं भटकण्यापेक्षा आपण आईला मासे पकडायला घेऊन जाऊ या, असं बाबांनी सुचवलं. 'एवीतेवी आपण मोटार भाड्यानं घेतलीच आहे तर आपण डोंगराजवळच्या तळ्यावर जाऊ. नुसतं भटकत बसलो तर आपल्याला कंटाळा येईल; पण मासे पकडत बसलो तर आपला वेळ मजेत कसा गेला ते आपल्याला कळणारसुद्धा नाही' असं बाबा म्हणाले.

आमचा बेत आईलाही पसंत पडेल असं आम्हाला वाटलं. बाबांनी खरं तर मासे पकडण्याचा एक नवा हूक आदल्या दिवशीच खरेदी करून ठेवला होता. त्यामुळे मासे पकडायला जायची कल्पना एकदम छान होती. शिवाय बाबा आईला म्हणाले की, 'हा नवा हूक तूच प्रथम वापर कारण मी तर तुझ्यासाठीच तो आणलाय.' पण आई म्हणाली, 'नको नको' तुम्हीच मासे पकडा. मी आपली नुसती बघेन.'

सहलीची सगळी तयारी झाली. आईनं सॅंडविचेस् बनवली. उशीर झाला तर भूक लागेल म्हणून बरोबर न्यायला थोडे पदार्थही बनवले; पण आम्ही ठरवलं होतं की दुपारीच परत यायचं. आणि नाताळप्रमाणे रात्री मोठं पक्वान्नाचं जेवण करायचं. आईनं डबे भरले आणि सगळ्या पिशव्या मोटारीत भरण्यासाठी तयार ठेवल्या.

मोटार दाराशी आली तेव्हा लक्षात आलं की आम्ही सगळे

मोटारीत मावणं शक्य नाही. बाबांचं मासे पकडण्याचं सामान, टोपल्या, काठ्या, दोरी, खाण्याचे डबे... बापरे! आमचं सामान इतकं वाढलं होतं की आम्ही सगळे आत घुसणं केवळ अशक्य होतं. बाबा म्हणाले, 'माझी काळजी करू नका. मी घरी थांबतो तोपर्यंत मी बागकाम करीन. शिवाय मला कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी खड्डे खणायचेत. निदान त्यामुळे या कामाला गडी तरी बोलवावा लागणार नाही.' ते पुढं म्हणाले, 'खरं तर गेल्या तीन-चार वर्षांत मी एक दिवसही खरी सुट्टी घेतली नाही; पण ते जाऊ द्या. तुम्ही आपले जा. खेळा, मजा करा. माझा विचार करू नका. मी आपला दिवसभर इथं काम करत बसेन. आज सुट्टीचा दिवस असं समजण्यात माझीच चूक झाली.'

बाबांना घरी ठेवायला कोणीच तयार नव्हतं. बाबा आले नाहीत तर ते मागून घर किती डोक्यावर घेतील हे सगळ्यांनाच ठाऊक होतं. ॲनी आणि मेरी आनंदानं घरी थांबल्या असत्या आणि स्वैपाकीणबाईंना त्यांनी कामात मदत केली असती; पण आजच्यासाठी त्यांनी मुद्दाम नव्या हॅटस् घेतल्या होत्या आणि दिवस इतका छान होता! अशा वेळी त्यांना घरी ठेवायचं म्हणजे? छे, ते शक्यच नव्हतं; पण तरी त्या दोघी म्हणाल्या, 'आई सांगू दे, मग आम्ही आनंदानं राहू आणि कामात मदत करू.' विल आणि मी खरंच घरी थांबलो असतो; पण आम्ही घरी थांबण्याचा उपयोग काय? आम्हाला थोडाच स्वैपाक येत होता?

शेवटी राहता राहता आईनं घरी राहायचं ठरलं, म्हणजे काय की तिलाही दिवसभर पूर्ण विश्रांती मिळाली असती आणि स्वैपाकही करता आला असता. शिवाय मासे पकडण्यातही तिला फारसा रस नव्हता. हवा तशी प्रसन्न आणि उबदार असली तरी

हवेत थोडासा गारठाही होताच. त्यामुळे बाबांना वाटलं, आई घरी थांबतीय ते बरंच आहे, नाही तर तिला नेमकी सर्दी झाली असती.

आईनं चांगला आराम करायचं सोडून उगीच उन्हा-तान्हात भटकून आजारी पडणं हे बाबांना बिलकूल आवडलं नसतं. ते म्हणाले, 'आई आपल्यासाठी इतकं काम करते, तेव्हा तिला आपण विश्रांती आणि थोडी शांतता मिळवून दिलीच पाहिजे. खरं म्हणजे म्हणून तर मी ही मासे पकडायला जायची कल्पना काढली, म्हणजे आईला तेवढाच घरी आराम मिळेल. म्हातारपणाकडे झुकायला लागलेल्या आमच्यासारख्या माणसांना शांतता ही किती महत्त्वाची चीज वाटते ते तुमच्यासारख्या पोरांना कळायचं नाही. आता माझी गोष्ट सोडा, मी तुमची गडबड सहन करू शकतो; पण आईला त्यापासून दूर ठेवणं माझं कर्तव्य आहे.'

मग काय, आम्ही सगळे निघालो. आमची मोटार दिसे-पर्यन्त दारात उभं राहून आई आमच्याकडे पाहात होती, आणि आई दिसेपर्यन्त दर दोन मिनिटांनी बाबा तिच्याकडे पाहून आपला हात हलवत होते. शेवटी खिडकीवर बाबांचा हात आपटला तेव्हा ते थांबले.

तुम्ही कल्पनासुद्धा करू शकणार नाही इतकी आम्ही धमाल केली. बाबांनी इतके हर तऱ्हेचे मासे पकडले ! आई आली असती तर तिला मासे पकडताच आले नसते. बिल आणि मी देखील मासे पकडले. अर्थात बाबांइतके नाही म्हणा ! ॲनी आणि मेरीलाही त्यांचे खूप मित्रमैत्रिणी भेटले. एकंदरीत आमची सहल मोठी झकास झाली.

परत आलो तेव्हा खूप उशीर झाला होता. रात्रीचे जवळ-जवळ सात वाजले होते. आईला कल्पना होतीच की आम्हाला उशीर होणार. आम्हाला गरम गरम जेवायला मिळावं म्हणून तिनं स्वैपाक करून पानं घेऊन ठेवली होती. बाबांनी मासे पकडतांना कपडे इतके घाण करून ठेवले होते की आल्या आल्या त्यांच्या आंघोळीची तयारी करून तिला त्यांचे कपडे प्रथम धुवायला लागले. मग मुलींचा पसारा आवरण्यात तिचा थोडा वेळ गेला. पण मग शेवटी आम्ही सगळे एकदा जेवायला बसलो. जेवणाचा बेत अगदी झकास होता. जेवणात दोन-चारदा राहिलेले पदार्थ आणण्यासाठी आईला आत-बाहेर करावं लागलं, ते बाबांच्या लक्षात आलं आणि ते म्हणाले, 'हे बघ, आजचा दिवस खास तुझा आहे. तेव्हा तू काहीही काम करायचं नाहीस.' म्हणून बाबा स्वतः उठले आणि पलीकडच्या आक्रोडाचा डबा घेऊन आले.

आम्ही सगळे हसत जेवत होतो. आम्ही सगळेजण मागचा पसारा आवरायला आणि भांडी घासून ठेवायला आईला मदत करणार होतो; पण आई म्हणाली की, 'नको ! मी सगळं करून टाकीन.' आम्ही म्हटलं की, एकदा तरी आईला तिच्या मनासारखं करू दे, म्हणून आम्ही तिला तिचं काम करू दिलं.

तिचं काम संपलं तेव्हा बराच उशीर झाला होता. झोपण्यापूर्वी आम्ही तिचा पापा घेतला तर ती म्हणाली, 'काय छान दिवस होता आजचा!' आणि असं म्हणताना तिच्या डोळ्यात पाणी तरारलं. आम्ही तिच्यासाठी दिवसभर इतके राबलो होतो, त्याचीच पावती आम्हाला मिळाली होती.

□

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय ठाणे.
बाल व कुमार विभाग.
अ. क्र. २८३६ दिनांक ९/८/८३
विषय गो:गो ... क्र. ........

# एका घराचा मृत्यू

ते एक छान घर होतं. २००५ साली बांधलेलं. त्यावेळच्या लोकांनी त्यांना राहण्यासाठी बांधलेलं. तशी घरं त्यावेळी पुष्कळांनी बांधलेली होती. ते घर खाणं-पिणं करायचं, झोपवायचं आणि घरातल्या लोकांची करमणूकसुद्धा करायचं. आई, बाबा आणि त्यांची दोन मुलं त्या घरात मोठ्या मजेत राहायची. बाहेरच्या जगात काही का होईना, घर त्यांना आनंदात ठेवायचं. बाहेरच्या सगळ्या छान छान गोष्टी – बोलणारी पुस्तकं, गाणारी गाणी, आपणहून पसरणारी अंथरुणं, स्वतःहून शेकोटीत पेटणारा अग्नी – त्या घरात हात जोडून तयार होता. त्या घरात राहणं म्हणजे मज्जाच होती.

एक दिवस सारं जगच हादरून गेलं. बाँबचा स्फोट झाला आणि तांबड्या भडक आगीचा लोळ आकाशात भरून गेला. राखेचा आणि अग्नीचा वर्षाव सुरू झाला. सुखाचे दिवस सरून गेले.

घराच्या हॉलमधलं घड्याळ गाऊ लागलं– ' टिक् टिक् – टिक् टिक्-- सात वाजले – उठा मंडळी उठा-- टिक् टिक् टिक् '-- जणू कोणी त्याच्या ह्याकारण्यानं उठत नव्हतं हे त्याला कळलंच होतं. घर रिकामं रिकामं होतं. त्या रिकाम्या सकाळी घड्याळाची बडबड मात्र चालू होती.

स्वैपाकघरात नाश्ता तयार होता. उकडलेली अंडी, भाजलेला ब्रेड, दोन कप चहा, दोन कप कोको. ' चला, चला, साडेसात झाले. नाश्ता तैयार आहे.'

' आज २८ एप्रिल २०१५ ' स्वैपाकघराच्या छताला लावलेल्या टेपनं सूचना दिली. ' आठवलं का, आज फेदरस्टोनचा वाढदिवस आहे. विम्याचं, गॅसचं, पाण्याचं आणि विजेचं बील आज भरायचं आहे.'

भिंतीला बसवलेला टेप मग आपलं काम बजावू लागला. ' ८ वाजून १ मिनिट, पळा पळा, शाळेची वेळ झाली. निघा निघा, ऑफिसची वेळ झाली. आठ वाजून एक मिनिट. टिक् टिक् '

पण आज दारं खडखडली नाहीत. जमिनीवर पावलं वाजली नाहीत. बाहेर पाऊस कोसळत होता-- दारावर बसवलेला हवामानाचा टेप मात्र गात होता, ' पावसा, पावसा, थांब थांब, छत्र्या घ्या छत्र्या, रेनकोट घाला, गमबूट घाला.' छपरावर पाऊस टपटपत होता.

८॥ वाजून गेले. नाश्ता वाळून गेला. अॅल्युमिनियमचा एक हात बाहेर आला आणि त्यानं ओटचाजवळच्या छोटचा मोरीत सगळ्या वश्या ढकलल्या गरम पाण्याच्या भोवऱ्यात

सगळ्या बश्या ढवळून निघाल्या. पाणी वाहून गेलं.

'सव्वानऊ' घड्याळ म्हणालं– 'स्वच्छतेची वेळ.' छोटे छोटे यांत्रिक उंदीर भिंतीच्या भोकातून पुढे झाले. सगळ्या घरभर हिंडत त्यांनी सगळा केरकचरा साफ केला आणि मग ते पुन्हा आपल्या बिळाकडे परतले.

दहाचे ठोके, ढगांच्या गर्दीतून सूर्याचे किरण डोकावले. आसपासच्या पडक्या घरांमध्ये फक्त तेच घर अजून एकटे उभे होते.

सव्वादहा! बागेतल्या फवाऱ्यांनी सकाळची मऊशार हवा सोनेरी कारंजांनी भरून काढली. घराची पांढरी सफेती आता धुऊन गेली होती. घर सगळं काळंमिट्ट दिसायला लागलं.

आजपर्यन्त घर कसं शांततेत राहिलं होतं. कुणाची चाहूल लागली की ते विचारायचं, 'कोण आहे रे तिकडे?' आणि जर का उत्तर मिळालं नाही तर ते फटाफट-दारं खिडक्या बंद करून घ्यायचं. एखाद्या चिमणीनं जरी खिडकीला स्पर्श केला तरी दार फटकन् लागून जायचं. बिचारी चिमणी दचकून, दूर उडून जायची. हो, म्हणूनच कुठल्याही पक्ष्याला घराजवळ येण्याचीसुद्धा परवानगी नव्हती.

घरात माणसं नव्हती; पण माणसांच्या सुखसोयीसाठी सतत काम करणारे दहा हजार रोबो सतत आपली सेवा बजावत होते.

घराच्या दारात एक बारकुडे कुत्रे विव्हळत पडले होते. ते तर मरायलाच टेकले होते. बाहेरच्या दरवाज्यानं कुत्र्याचा ओळ-खीचा आवाज ऐकला आणि ते उघडले. अंगावरचा चिखल

कार्पेटवर झाडत ते कसेबसे आत आले. रागारागानं उंदिरसेनेनं येऊन पुन्हा सगळी स्वच्छता केली. रिकाम्या खोल्यांच्या दाराशी उभं राहून कुत्रं सगळीकडे केकाटत होत. स्वैपाकघरातून केक भाजल्याचा वास येत होता. कुत्रं शेवटी बाहेरच्या खोलीत येऊन मरून पडलं. तासभर झाला तरी ते तिथंच होतं.

एकच ठोका !

उंदिर सेनेची धावपळ

सव्वा वाजला

कुत्रं साफ करून टाकलं.

दोन पस्तीस

भिंतीतून ब्रीज खेळायची टेबल बाहेर आली. पत्ते पिसून वाटले गेले. स्टुलावर सरबताचे ग्लास तयार बसले; पण आज टेबलं शांत होती. पत्त्यांना कुणी हात लावलाच नाही.

४॥ वाजले. टेबलांच्या घड्या झाल्या. पुन्हा भिंतीत गेल्या.

५ वाजले. मोरीतले टब गरमागरम पाण्याने भरले.

सहा, सात, आठ, नऊ.

रात्रीचं जेवण तयार; कुणी त्याकडे पहायला नाही. जेवण दूर सारलं गेलं. ताटं विसळली गेली. अभ्यासिकेत सिगरेट पेटली. धूर बाहेर पडू लागला. ती वाट पाहात राहिली. शेकोटीत अग्नी पेटला.

नऊ वाजले. रात्र गारव्याची होती. उबदार अंथरुणं तयार झाली. टेपमधून आवाज घुमला–

'मिसेस् मॅक्लिन, कोणती कविता ऐकवू तुम्हाला आज ?'

घर शांत स्तब्ध होतं.

टेप म्हणाला, 'बरं, आज मीच निवडतो.' संगीताचे शांत स्वर आवाजामागून बाहेर पडू लागले, 'मला वाटतं, हे गाणं तुमचं आवडतं आहे.'

कविता संपली. स्वर येत होते तेव्हा रिकाम्या खुर्च्या शांत भिंतींमध्ये एकमेकांकडे पाहात बसल्या होत्या.

दहा वाजता घर संपायला सुरुवात झाली. वारा बेफाम सुटला होता. झाडाची एक कोसळणारी फांदी स्वैंपाकघराच्या खिडकीवर आदळली. स्वच्छता करणारं एक द्रावण गॅसवर पडलं.

'आग, आग' टेप किंचाळू लागला. पाण्याच्या फवाऱ्यांनी छतावरून पाण्याचा मारा सुरू केला;. पण तो द्राव दाराखालूनही वाहात गेला आणि आपल्याबरोबर आग पसरवीत चालला. घराच्या सगळ्या कानाकोपऱ्यांतून धोक्याचे गजर एकसुरात वाजू लागले.

आगीच्या धगीनं खिडक्या फुटल्या. वारा घरात शिरला आणि आग फोफावयाला लागली. कुठून तरी एकदम मग पाण्याचे फवारे थांबले. नळ आटले. मोरीतला जादा पाण्याचा साठा, कितीतरी दिवस बशा विसळायचा, तोही गायब झाला.

आग आता दुसऱ्या मजल्यावर चढली आणि तिने वरची पेंटिंग्ज खाऊन टाकली. मग ती एकेक करून सगळ्या खोल्या खात सुटली.

घर कापू लागलं. बाहेर आलेल्या वायरी रक्तवाहिन्यांसारख्या दिसू लागल्या. आवाज किंचाळत होते– 'वाचवा वाचवा,

आग आग.' खिडक्यांची सारखी उघडमीट चालू होती. आऽ वासलेल्या तोंडासारख्या त्या दिसत होत्या. 'पळा पळा, आग' वायरी जळू लागल्या. बॅटऱ्या वितळू लागल्या, तसे आवाज कमी कमी होऊ लागले.

घराच्या दुसऱ्या भागातून अजून जाहीर निवेदनं चालू होती. वेळेबद्दल, कामाबद्दल, जेवणाबद्दल, संगीताबद्दल आणि जळत्या अभ्यासिकेतून कवितेच्या वाचनाबद्दल !

दारं उघडत होती, आपटत होती. दाराशी छत्र्या येत, पुन्हा दूर होत. वायर पुरती जळेस्तो कुणी केकाटत होतं. कुणी हळू आवाजात कुजबुजत होतं. हजारो गोष्टी घडत होत्या. एकच धावपळ चालू होती.

घर पुरतं कोसळण्यापूर्वी क्षणभर आधी स्वैपाकघरात स्वैपाकाला वेग आला होता. ढीगभर केक... ढीगभर पावाचे तुकडे...

धपाप ! माळ्यानं स्वैपाकघर खाली आणलं. फ्रीज, खुर्च्या, फिल्म टेप्स, अंथरुणं, सारं काही त्या खाली गाडलं गेलं.

प्रचंड धुरळा आणि शांतता.

पूर्वेकडे अंधुक पहाट फुटतीय. त्या अवशेषातही एक भिंत उभीय. भिंतीतून एक आवाज येऊन पुन्हा पुन्हा सांगतोय-

'आज २९ एप्रिल २०१५, आज २९ एप्रिल २०१५, आज..'

# नीलमण्यांची माला

जीन ग्रेसनं दुकानाचं दार उघडलं त्या दिवशी पीट रिचर्डस् हा शहरातला एक एकाकी माणूस होता. ही हकिगत घडली त्यावेळी वर्तमानपत्रातून तुम्ही ती कदाचित् वाचली असेल. अर्थातच त्यात त्या दोघांची नावं नव्हती आणि मी सांगतोय ती संपूर्ण कथाही नव्हती.

पीटला आपलं दुकान आपल्या आजोबांकडून मिळालेलं होतं. दुकानाची समोरची छोटीशी बाजू सुंदर सुंदर देखण्या वस्तूंनी सजली होती. बांगड्या, नेकलेस, सोन्याच्या रिंगा, हस्तिदंताच्या मूर्ती, एक ना दोन, अनेक वस्तू तिथं दाटीवाटीनं उभ्या होत्या.

हिवाळ्यातल्या एका दुपारी एक छोटीशी मुलगी काचेला नाक लावून बाहेर उभी होती. तिचे मोठे मोठे डोळे एकेक वस्तू

मनातून गाळून टाकत काहीतरी खास वस्तूचा शोध घेत फिर-फिरत होते. शेवटी बहुधा तिचं समाधान झालं आणि ती दुकानात शिरली.

पीट रिचर्डस्च्या दुकानाचा अंतर्भाग तर विक्रीच्या वस्तूंनी नुसता भरगच्च भरला होता. शेल्फांवर खड्याच्या दागिन्यांच्या पेट्या, घड्याळ, तऱ्हेतऱ्हेचे दिवे दाटीवाटीने उभे होते. कित्येक माल तर शेल्फावर जागा नसल्याने जमिनीवर पडून होता. काउं-टरमागे पीट उभा होता. असेल तीस एक वर्षाचा; पण केस आत्ताच पांढरे व्हायला लागले होते. तो उदासपणे उभा होता. तेव्हाच आपले चिमुकले हात पसरवून काउंटरशी उभी असलेली ती छोटी मुलगी त्याला दिसली.

'त्या शोकेसमधील ती निळ्या मण्यांची माळ दाखवता का जरा ?' ती म्हणाली.

पीटनं आतलं काचेचं दार उघडलं आणि ती माळ बाहेर काढली. त्यानं आपल्या तळव्यावर ती माळ धरली तेव्हा आकाशी रंगाचे ते निळे मणी चमचम करत होते.

'वा ऽ सुंदर' ती स्वत:शीच म्हणाली, 'एखाद्या छान काग-दात बांधून द्या.'

पीटनं थंडपणे तिला न्याहाळलं.

'तुला ही माळ कुणाला भेट द्यायची आहे का ?' त्यानं विचारलं

'हो; माझ्या ताईला ती माझी किती काळजी घेते! आई गेल्यावरचा हा पहिलाच नाताळ आहे म्हणून तर मी तिच्यासाठी एखादी सुंदर भेट वस्तू बघत होते.'

‘ तुझ्याकडे किती पैसे आहेत ?’ असे विचारल्यावर हातातल्या मुठीत ठेवलेल्या रुमालाच्या गाठोड्याची गाठ सोडत तिनं त्यातली मूठभर नाणी काऊंटरवर ओतली.

‘ मी माझ्याकडचे सगळे पैसे आणलेत.’ ती निरागसपणे म्हणाली.

पीट रिचर्डस् विचार करत तिच्याकडे बघत राहिला. मग त्यानं हळूच ती नीलमण्यांची माळ मागे घेतली. त्याला दिसत होतं; पण तिला मात्र दिसत नव्हतं. आता तिला कसं सांगायचं ? तिच्या निळ्या डोळ्यातला विश्वास एका जुन्या जखमेच्या दुःखासारखा त्याला जाणवला.

‘ एक मिनिट हं.’ असं म्हणून त्यानं तिच्याकडे पाठ केलं आणि मागे न वळताच तो म्हणाला, ‘ तुझं नाव काय ?’ हातानं तो त्यावेळी काहीतरी करत होता.

‘ जीन ग्रेस.’

नंतर वळून तो जीनपाशी आला आणि हिरव्या रिबननं गुंडाळलेलं एक गुलाबी पाकीट त्यानं तिच्या हाती दिलं.

‘ हे घे. आणि रस्त्यावर हरवू नकोस बरं का ’ त्यानी बजावलं.

त्याच्याकडे पाहून गोड हसत ती रस्त्याकडे धावत सुटली. तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे तो बघतच राहिला आणि आपले एकाकीपण त्याला अधिकच बोचायला लागलं. जीन ग्रेस आणि तिच्या त्या माळेनं जुनं दुःख उफाळून वर आलं होतं. तिचे केस

सोनेरी होते, डोळे समुद्रासारखे निळे होते; आणि काही काळा-पूर्वी अशाच एका सोनेरी केसाच्या आणि निळ्या डोळ्यांच्या मुलीवर त्यानं अपरंपार प्रेम केलं होत. ती नीलमण्यांची माळा त्या मुलीला तो देणार होता.

पण अचानक ती पावसाळी रात्र आली– निसटत्या रस्त्या-वरून एक ट्रक धडधडत आला – आणि त्याच्या स्वप्नांचा चुराडा करत एक आयुष्य संपवून गेला.

त्या दिवसापासून आपल्या दु:खाच्या सोबतीनं पीट एकाकी जीवन जगू लागला. गिऱ्हाईकांशी तो अतिशय सौजन्यानं वागे; पण कामाची वेळ संपल्यावर त्याला सगळं जग भकास वाटे दिवसेंदिवस अधिकाधिक खोल रुतणारं ते दु:ख विसरण्याचा तो प्रयत्न करत होता. जीन ग्रेसच्या निळ्या डोळ्यांनी, एकदम धक्का द्यावा, तशा गमावलेल्या त्या ठेव्याच्या आठवणी त्याच्या मनात उफाळून आल्या. लोकांच्या सणाच्या खरेदीच्या धामधुमी-पासून त्या दु:खानं त्याला बाजूला काढलं. पुढचे दहा दिवस धंदा अगदी जोरात चालू होता. बडबड्या बायकांचे घोळकेच्या घोळके दुकानात येत होते. घासाघीस चालू होती. बांगड्या, दागिने अनेक गोष्टींची खरेदी उत्साहात होत होती. नाताळच्या दिवशी रात्री जेव्हा शेवटचं गिऱ्हाईक येऊन गेलं तेव्हा त्याने सुटकेचा नि:श्वास टाकला. आता एक वर्षभर तरी काळजी नव्हती. पण पीट रिचर्डस्ची रात्र मात्र अजून संपली नव्हती.

अर्धवट लावलेली दारं उघडून एक तरुण स्त्री घाईघाईनं त्याच्या दुकानात शिरली. तो दचकला; पण तिचा चेहरा त्याला

ओळखीचा वाटला, पण तिला केव्हा आणि कुठं पाहृचलंय हे काही त्याला आठवेना. तिचे केस सोनेरी होते आणि डोळे निळे होते. काही न बोलता तिनं आपली पर्स उघडली आणि त्यातून हिरव्या रिबनीत सैलसर गुंडाळलेलं एक गुलाबी पाकीट काढलं. त्याच्या समोर काढून ठेवलेली त्यातली नीलमण्यांची माळ झगमगू लागली

‘ ही तुमच्याच दुकानातली आहे ना ?’ तिनं विचारलं.

पीटनं तिच्याकडे मान वर करून पाहृचलं आणि तो म्हणाला, ‘ हो, माझ्याचकडची आहे.’

‘ हे खरे हिरे आहेत ?’

‘ हो ; सर्वोत्कृष्ट नाहीत – पण खरे आहेत.’

‘ हे हिरे आपण कुणाला विकलेत आठवतंय आपल्याला ?’

‘ हो, ती एक छोटी मुलगी होती. तिचं नाव जीन. तिने आपल्या बहिणीसाठी नाताळाची भेट म्हणून ते घेतले.’

‘ ह्याची किंमत काय ?’

‘ विक्रेता आणि गिऱ्हाईक यांच्यामधली किंमत ही एक खाजगी गोष्ट आहे.’ तो गंभीरपणे म्हणाला.

‘ पण जीनकडे तर फक्त मूठभर सुटी नाणी होती. त्या पैशात ही माळ येणं शक्यच नाही.’

चुरगाळलेल्या त्या कागदात पीटनं ती माळ कागद नीट करून पुन्हा बांधून टाकली.

‘ कोणी कधीच देऊ शकणार नाही इतकी मोठी रक्कम तिनं मला दिली.’ तो म्हणाला, ‘ तिच्याकडे होतं ते सर्व तिनं मला दिलं.’

शांततेनं ते छोटं दुकान भरून गेलं. दूरवरच्या कोणत्या तरी चर्चमध्ये घंटा वाजू लागल्या. घंटांचा तो दूरवरून येणारा नाद, काउंटरवर पडलेलं ते छोटं पाकिट, त्या तरुण मुलीच्या डोळ्यातलं प्रश्नचिन्ह आणि त्याच्या हृदयात धडपडणारी एका नव्या आशेची जाणीव -- हे सगळं त्या छोट्या मुलीच्या प्रेमामुळे घडत होतं.

'पण तुम्ही असं का केलंत ?'

त्यानं ती भेटवस्तू त्या तरुणीपुढे केली,

'नव्या वर्षाची पहाट होते आहे' तो म्हणाला, 'आणि कुणाला काही भेट द्यावी असं मला कुणीही नाही इतका मी दुर्दैवी आहे. तुमच्या घरी येऊन तुम्हाला मी नव्या वर्षाच्या शुभेच्छा दिल्या तर चालेल का ?'

आणि त्यानंतर कितीतरी घंटांच्या नादात आणि रस्त्यावरून जाणाऱ्या आनंदी माणसांच्या गर्दीतून पीट रिचर्डस् आणि जिचं नावही अजून ठाऊक नव्हतं ती मुलगी आशेचे किरण घेऊन येणाऱ्या नव्या दिवसांच्या रस्त्यावरून निघाले.

म. सं. मं. डार्वे, वाचनालय वाचा.
बाल वाङ्मय विभाग
वा. क्र. 2CB6 दिनांक 9/8/8.3
विषय ....आ.पा.... क्र..........



BVBK-0402837